दि. २६/०५/२०२३

म.टा.पा.नं. ५

# ‘सरकारवर मोठा हल्ला’

## दिल्ली विधेयकाच्या अनुषंगाने पवार यांची टीका; केजरीवाल यांनी घेतली भेट

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

दिल्ली सरकारच्या विरोधात आणलेल्या अध्यादेशाला राष्ट्रवादीचे खासदार संसदेत विरोध करतील, असे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी आम आदमी पक्षाचे अध्यक्ष, तसेच दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिले. लोकशाही वाचविण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे. गेल्या ५६ वर्षांच्या संसदीय इतिहासात निवडून आलेल्या सरकारवर हा मोठा हल्ला आहे. त्या वादग्रस्त अध्यादेशाबाबत अन्य पक्षांच्या नेत्यांशी बोलणार आहे, असेही पवार यांनी स्पष्ट केले. केजरीवाल यांनी गुरुवारी पवार यांची भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते.

विद्याधर राणे



### लोकशाहीवर आघात

'तपास यंत्रणांच्या दबावाखाली राज्य सरकार झुकले नाही, तर अध्यादेश काढले जातात. शरद पवार हे देशातील उत्तुंग नेते आहेत. त्यांच्याकडून सहकार्याची अपेक्षा आहे. राज्यसभेत या अध्यादेशाबाबतचे विधेयक नामंजूर झाल्यास २०२४चे चित्र दिसून येईल,' असेही केजरीवाल यांनी नमूद केले. 'देशात लोकशाही मूल्ये पायदळी तुडवली जात आहेत,' अशी टीका पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी केली. दरम्यान, 'देशात सध्या भाजपकडून लोकशाहीवर आघात सुरू आहेत. ही समस्या फक्त दिल्लीची नव्हे, तर संपूर्ण देशाची आहे. त्यामुळे आम्ही केजरीवाल यांच्या पाठीशी आहोत,' असे पवार यांनी अधोरेखित केले. 'शरद पवार हे देशातील सर्वांत वरिष्ठ नेत्यांपैकी एक आहेत आणि त्यांनी संसदेत या विधेयकाला विरोध करण्यासाठी विरोधी पक्ष आणि इतर बिगरभाजप पक्षांशी बोलले पाहिजे,' असे मतही केजरीवाल यांनी व्यक्त केले.

केंद्र सरकारने आणलेला अध्यादेश हा केवळ दिल्लीकरांच्या विरोधात नसून, देशाच्या संघराज्य प्रणालीवर केलेला आघात आहे. त्यामुळे केंद्रांच्या घटनाविरोधी अध्यादेशाच्या विरोधात राज्यसभेत विरोधकांनी मतदान करावे, असे आवाहन दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांनी केले. त्या आवाहनास राष्ट्रवादी काँग्रेस आणि ठाकरे गटाने पाठिंबा दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली सरकारला त्यांच्या अखत्यारित असलेल्या खात्यांच्या अधिकाऱ्यांची बदली करण्याचा अधिकार दिले होते. या निकालानंतर काही दिवसांतच केंद्र सरकारने दिल्ली सरकारचे अधिकाऱ्यांच्या बदलीचे अधिकार गोठवणारा अध्यादेश जारी केला. या पार्श्वभूमीवर दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांनी विरोधी पक्षाच्या नेत्यांची भेट घेण्यास सुरुवात केली आहे. केजरीवाल दोन दिवसांपासून मुंबई दौऱ्यावर आहेत. त्यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांची बुधवारी मातोश्रीवर भेट घेतली. गुरुवारी राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांची यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये भेट घेतली.

पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, खा. संजय सिंह, राघव चड्ढा, राष्ट्रवादीकडून शरद पवार यांच्यासह विरोधी पक्षनेते अजित पवार, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, खा. सुप्रिया सुळे, प्रफुल्ल पटेल, जितेंद्र आव्हाड, जयंत पाटील आदी यावेळी उपस्थित होते. त्यानंतर शरद पवार आणि केजरीवाल यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. 'केंद्र सरकारकडून दिल्ली सरकारच्या अधिकारांवर हल्ला करण्यात येत आहे. केंद्राकडून राज्य सरकारचे अधिकार हिरावून घेण्यात आले. राज्यसभेत विधेयक मंजूर होऊ देणार नाही. हा फक्त दिल्लीचा नव्हे, तर संघराज्याचा मुद्दा आहे. विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांसोबत केंद्रातील भाजप सरकार दुजाभाव करत आहे. ईडीसह अन्य तपास यंत्रणांची भीती दाखवली जाते. या कारवाईला एखाद्या पक्षाने जुमानले नाही, तर आमदार फोडले जातात. फोडाफोडीतून भाजप सरकार स्थापन करते. हेच महाराष्ट्रात दिसून आले,' असा थेट आरोप केजरीवाल यांनी केला.

म.टा.पु.पा.नं. १

# बोगस सिमकार्डप्रकरणी दोन विक्रेत्यांवर गुन्हा

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

### मिरा-भाईंदरमध्ये कारवाई

एकाच व्यक्तीच्या बनावट कागदपत्रांआधारे अनेक मोबाइल सिमकार्ड सुरू करण्यात आल्याच्या प्रकरणात, मिरा-भाईंदरमध्ये दोघा सिमकार्ड विक्रेत्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या दूरसंचार विभागाच्या आदेशानुसार, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिसांच्या सायबर शाखेने ही कारवाई केली आहे.

मुंबई व लगतच्या शहरात एकाच व्यक्तीचे फोटो व इतर बोगस कागदपत्रे वापरून अनेक सिमकार्ड सुरू करण्यात आल्याची बाब केंद्रीय दूरसंचार विभागाच्या निदर्शनास आली होती. त्यानुसार त्यांनी माहिती देत, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाला पडताळणी करून कारवाई करण्याचे आदेश दिले होते. अधिक तपास करताना, पोलिसांच्या सायबर शाखेला भाईंदरमधील एटीसी व ओम मोबाइल या दोन सिमकार्ड विक्रेत्यांनी एकाच व्यक्तीच्या नावावर बोगस कागदपत्रांआधारे मागील वर्षभरात १४४ सिमकार्ड बेकायदा पद्धतीने सुरू केल्याचे समोर आले होते.

या प्रकरणाची सायबर गुन्हे शाखेने भाईंदरच्या नवघर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यावरून नवघर पोलिसांनी दोन्ही सिमकार्डविक्रेत्यांविरोधात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

दि. 26/05/2023

म.टा. पा.न. 1

# 'एमपीएससी'चा हॅकर जेरबंद

## हॉल तिकिटाच्या डाटाचोरीप्रकरणी अटक; प्रश्नपत्रिकाही हॅक करण्याचा होता प्रयत्न

**म. टा. वृत्तसेवा, नवी मुंबई**

- तब्बल ९४,१९५ हॉल तिकिटे बेकायदेशीररित्या केली डाउनलोड
- उमेदवारांच्या हॉल तिकिटांचा डाटा 'एमपीएससी २०२३ ए' या 'टेलिग्राम'च्या चॅनलवर बेकायदेशीरीत्या प्रसारित
- आरोपी रोहित दत्तात्रय कांबळेला २७ मे पर्यंत पोलिस कोठडी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) वेबसाइटवर टाकण्यात आलेली संयुक्त पूर्व परीक्षेची तब्बल ९४,१९५ हॉल तिकिटे बेकायदेशीररित्या डाऊनलोड करून ही हॉल तिकिटे 'टेलिग्राम'वर बेकायदेशीररीत्या प्रसारित करणाऱ्या रोहित दत्तात्रय कांबळे (वय १९) या तरुणाला नवी मुंबई पोलिसांच्या सायबर सेलने पुणे येथून अटक केली आहे. रोहित कांबळे हा डार्कनेटवरील काही हॅकर्सच्या संपर्कात असल्याचे आढळून आले आहे.



### हॅकिंगसाठी ४०० डॉलरची सुपारी

पोलिसांनी केलेल्या चौकशीत रोहित कांबळे हा बीएससीच्या दुसऱ्या वर्षात शिकत असून, त्याने सायबर सेक्युरिटीचे विविध प्रकारचे कोर्सेस केल्याचे तपासात आढळून आले आहे. तसेच तो डार्क नेटवरील काही हॅकर्सच्या संपर्कात असल्याचे तपासात आढळून आले असून, डार्कनेटवरील हॅकर्सनी त्याला एमपीएससीच्या वेबसाइटवरून उमेदवारांचे हॉल तिकीट व एमपीएससी परीक्षेचे प्रश्नपत्रिका हॅक करण्यासाठी तब्बल ४०० डॉलरची सुपारी दिल्याचे तपासात आढळून आले आहे. त्यानुसार पोलिसाकडून पुढील तपास करण्यात येत आहे, अशी माहिती पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी दिली.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने गट 'ब' आणि गट 'क'च्या संयुक्त पूर्व परीक्षेच्या उमेदवारांची हॉल तिकिटे २८ एप्रिलला आपल्या वेबसाइटवर टाकली होती. ही हॉल तिकिटे उमेदवारांच्या सोयीसाठी बाह्य लिंकद्वारे आयोगाच्या वेबसाइटवर टाकण्यात आली होती. मात्र, याच गोष्टीचा फायदा घेत अज्ञात हॅकरने आयोगाने वेबसाइटवर टाकलेल्या बाह्य लिंकमध्ये बेकायदेशीररित्या प्रवेश करून त्यातील माहिती अवैधरित्या प्राप्त करून त्याद्वारे वेबसाइटवरील तब्बल ९४,१९५ उमेदवारांची हॉल तिकिटे डाऊनलोड केली होती. त्यानंतर हॅकरने आयोगाच्या वेबसाइटवरून डाऊनलोड केलेला उमेदवारांच्या हॉल तिकिटांचा डाटा 'एमपीएससी २०२३ ए' या 'टेलिग्राम'च्या चॅनलवर बेकायदेशीरीत्या प्रसारित केला होता.

या प्रकारानंतर एमपीएससीच्या उमेदवारांमध्ये गोंधळाचे वातावरण पसरले होते. त्यानंतर आयोगाचे सहसचिव सुनील अवताडे यांनी नवी मुंबई पोलिसांच्या सायबर सेलकडे याबाबत तक्रार दाखल केल्यानंतर नवी मुंबई पोलिसांच्या सायबर सेलने या संपूर्ण प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली होती. या तपासात सायबर सेलचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय वाघमारे व त्यांच्या पथकाने या प्रकरणाचा सखोल तांत्रिक तपास करून अज्ञात हॅकरने गुन्हा करताना वापरलेला आयपी अॅड्रेस मिळवून तांत्रिक माहितीच्या आधारे संशयित आरोपी रोहित दत्तात्रय कांबळे याला पुण्यातील चिखली, पाटीलनगर येथून बुधवारी ताब्यात घेतले. यावेळी पोलिसांनी रोहित कांबळे याच्या घरातून गुन्ह्यात वापरलेला १ डेस्कटॉप, १ लॅपटॉप, ३ मोबाइल फोन व एक इंटरनेट राऊटर असे साहित्य जप्त केले आहे.

पोलिसांनी केलेल्या चौकशीत रोहित कांबळेने त्याच्या साथीदारांसह हा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. त्यानुसार त्याला अटक करण्यात आल्याची माहिती पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी दिली. रोहित कांबळेने डार्क नेटवरील साथीदारांच्या मदतीने अशाच प्रकारचे आणखी काही गुन्हे केले असण्याची शक्यता आहे. त्यानुसार त्याची कसून चौकशी करण्यात येत असल्याचे पोलिस आयुक्त भारंबे यांनी सांगितले. न्यायालयाने त्याला २७ मे पर्यंत पोलिस कोठडी ठोठवल्याचेही त्यांनी सांगितले.

म.टा.पु.पा.न. 1

# मराठी नाटकांची तिसरी घंटा वाजेना

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदरमधील स्व. लता मंगेशकर नाट्यगृहाचा पडदा उघडून निम्मे वर्ष उलटले असून या नाट्यगृहात विविध कार्यक्रमही पार पडत आहेत. परंतु, येथे मराठी नाटकांचे आयोजन करण्याकडे नाट्य निर्मात्यांनी पाठ फिरवली आहे. मागील काही महिन्यांत येथे अवघे दोन ते तीन मराठी नाट्यप्रयोग पार पडले. त्यामुळे मिरा-भाईंदरमधील नाट्यप्रेमी मराठी नाटकाच्या प्रतीक्षेत आहेत.

मिरा-भाईंदरमध्ये स्व. लता मंगेशकर यांच्या नावे नाट्यगृह उभारण्यात आले आहे. याचे उद्घाटन गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये पार पडले. मात्र त्यानंतर मराठी नाटकाचा पहिलाच प्रयोग नाट्यगृहातील ध्वनियंत्रणेतील तांत्रिक अडचणींमुळे रद्द करण्यात आला होता.

यानंतर पालिका प्रशासनाने ध्वनियंत्रणेतील तांत्रिक त्रुटी दूर केल्या. तेव्हापासून अनेक खासगी कार्यक्रम येथे आयोजित केले जात आहेत, परंतु, मराठी नाटकांचे प्रयोग येथे करण्याकडे मात्र नाट्य निर्मात्यांनी पाठ फिरवली आहे. मागील सहा महिन्यांच्या कालावधीत केवळ दोन ते तीन मराठी नाटकांचे प्रयोग या नाट्यगृहात पार पडल्याचे सांगण्यात येते. नाटक पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या मुख्य हेतूने उभारणी केलेल्या या नाट्यगृहात मराठी नाटक पाहण्याची संधी मिळत नसल्याने नाट्यप्रेमी नाराजी व्यक्त करत आहेत.

मंगेशकर नाट्यगृहात सुरुवातीला तांत्रिक अडचणी येत होत्या, हा संदेश नाट्य निर्मात्यांपर्यंत गेल्याने त्यांनी येथे प्रयोग लावण्याकडे पाठ फिरवल्याचे काहींचे मत आहे. त्यामुळे प्रथम नाट्य निर्मात्यांशी चर्चा करून नाट्यगृहातील सर्व त्रुटी दूर केल्यास त्याची माहिती त्यांना द्यायला हवी, तसेच येथे नाटक लावण्यासाठी प्रोत्साहनपर उपाययोजना करायला हव्यात, असे मत नाट्यकर्मींकडून व्यक्त केले जात आहे.

### मंगेशकर नाट्यगृहाकडे नाट्यनिर्मात्यांची पाठ



### ५० ते ६० लाखांचे उत्पन्न

मंगेशकर नाट्यगृहात मराठी नाटक वगळता इतर विविध कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर पार पडत आहेत. यात खासगी शाळा, कार्यालये, सामाजिक संस्था इत्यादींचा समावेश आहे. यातून मागील काही महिन्यांत पालिकेने तब्बल ५० ते ६० लाख रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. आगामी काही महिन्यांच्या तारखांसाठी आधीच नोंदणी करण्यात आली आहे. गुजराती व हिंदी भाषेतील कार्यक्रमांना अधिक प्रतिसाद मिळत असल्याचे सांगितले जात आहे.

### अडचणी दूर करण्यासाठी पाहणी

मराठी नाट्य निर्मात्यांनी मंगेशकर नाट्यगृहाकडे पाठ फिरवण्यामागे तांत्रिक अडचणी हे मुख्य कारण असल्याचे सांगितले जाते. या पार्श्वभूमीवर नाट्यगृहातील अडचणींची माहिती घेत, ते दूर करण्यासाठी पालिकेच्या अधिकाऱ्यांकडून नाट्यगृहाची पाहणी करण्यात येणार असल्याचे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

CamScanner

दि. २६/०५/२०२३

लोकमत पु. पा. नं. २

# मीरा-भाईंदर पालिकेच्या न्यायालय इमारतीलाच ९१ लाखांची नोटीस

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** शहरात बांधल्या जाणाऱ्या न्यायालयाच्या इमारतीच्या मोकळ्या जागेच्या कर व व्याजापोटी तब्बल ९१ लाख रुपये भरण्याची नोटीस मीरा-भाईंदर महापालिकेने पाठवली आहे. ठाण्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अभय मंत्री यांनी, प्रस्तावित न्यायालय हे लोकहितार्थ, महापालिका आणि नागरिकांच्या हितासाठी असल्याची जाणीव महापालिकेला करून देत संपूर्ण कर माफी करण्याचे पत्र दिले आहे.

मीरा-भाईंदर महापालिका, सहा पोलिस ठाणी, गुन्हे शाखा, पोलिस आयुक्तालय तसेच विविध सरकारी कार्यालये आहेत. त्यामुळे वाढते गुन्हे तसेच दिवाणी स्वरूपाचे दावे मोठ्या प्रमाणात असून, प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसह नागरिकांना न्यायालयीन कामासाठी ठाणे येथे जावे लागते. यात वेळ, इंधन व पैसा वाया जातो शिवाय सारख्या खेपा माराव्या लागत असल्याने शहरात न्यायालय सुरू करण्याची गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी होती.

राज्याच्या विधी व न्याय विभागाकडून १९ मार्च २०१३ रोजी न्यायालयाची तीन मजली इमारत बांधण्यास मंजुरी मिळाल्यावर शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने ठेकेदार नेमला. मीरारोडच्या १५ क्रमांक बस स्थानक घोडबंदर येथील सरकारी जागेत न्यायालय व न्यायाधीशांसाठी सदनिका इमारत मंजूर झाल्यानंतर येथील ४ हजार ३५३ चौमी क्षेत्रात २०१४ साली बांधकाम सुरु झाले. महापालिकेने त्यासाठी बांधकाम परवानग्या दिल्या. परंतु निधीअभावी २०१७ पासून न्यायालय इमारत व न्यायाधीश निवास इमारतीचे काम रखडले. मात्र आमदार प्रताप सरनाईक यांनी शासनाकडे पाठपुरावा करून निधी मंजूर करून घेतल्याने पुन्हा कामास सुरुवात झाली असून, न्यायालयीन इमारतीचे काम पूर्ण झाले आहे.

दरम्यान, मीरा-भाईंदर महापालिकेने न्यायालयीन इमारत व न्यायाधीश निवासस्थान इमारतीला मोकळ्या जागेची कर आकारणी पालिकेने बांधकाम परवानगी दिल्यापासून आकारण्यास सुरुवात केली. मोकळ्या जागेवरील कराची मूळ रक्कम आणि त्यावरील व्याज धरून तब्बल ९१ लाख ३ हजार रुपये भरण्याची नोटीस पालिकेने शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागास बजावली आहे.



१ आधीच निधीअभावी न्यायालयाचे काम रखडले असताना, पालिकेने इतक्या मोठ्या रकमेची मागणी केल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने पालिकेचे पत्र ठाणे जिल्हा व सत्र न्यायालयाच्या कार्यालयास पाठवले.

२ ठाण्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अभय मंत्री यांनी २४ मे रोजी महापालिका आयुक्तांना पत्र पाठवून न्यायालय इमारत ही न्यायालयीन कामकाजासाठी असून, लोकहितार्थ व मीरा-भाईंदरमधील जनता आणि महापालिकेच्या न्यायालयीन, सोयीसाठी बांधण्यात येत असल्याचे पत्रात नमूद करत एकप्रकारे खडेबोल सुनावले आहेत.

३ खुल्या जागेची कर आकारणी खूप जास्त रकमेची असून, संयुक्तिक नाही. त्यामुळे खुल्या जागेच्या करामध्ये पूर्णतः सूट देण्यात यावी, अशी मागणी प्रमुख जिल्हा न्यायाधीश मंत्री यांनी केली. न्यायाधीशांच्या पत्रावर आयुक्त दिलीप ढोले व नगररचना विभाग काय निर्णय घेते याकडे लक्ष लागले आहे.

लोकमत पु. पा. नं. ४

# उत्तनवासीयांची राहती घरे सुरक्षितच : जैन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदरच्या उत्तन चौक, पाली, डोंगरी, तारोडी गावांतील स्थानिक भूमिपुत्र मच्छीमार व शेतकऱ्यांच्या सरकारी जमिनीवरील पूर्वीपासूनची राहती घरे ही सुरक्षित आहेत. राज्य सरकार त्यांच्या पाठीशी आहे. त्यामुळे कोणी समाजकंटक भूमिपुत्रांना घाबरवत असेल तर घाबरण्याचे अजिबात कारण नाही, अशी ग्वाही आमदार गीता जैन यांनी उत्तन येथे गुरुवारी झालेल्या बैठकीत दिली.

सदर गावांमध्ये भूमिपुत्र हे पिढ्यान्पिढ्या राहत असून शासनानेदेखील धोरण निश्चित करून राहती घरे संरक्षित केली आहेत. तरीदेखील काही समाजकंटक हे भूमिपुत्रांच्या पिढीजात घरांबाबत तक्रारी करून त्यांना वेठीस धरत आहेत.

त्यातच मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर अप्पर तहसीलदार नीलेश गौंड यांनी गायरान जमिनीवरील अतिक्रमणांना नोटीस बजावल्यानंतर समाजकंटकांमध्ये आणखी भीतीचे वातावरण निर्माण करत असल्याचा आरोप जैन यांनी संत पीटर कोळी जमात सभागृहात गुरुवारी बैठकीत केला.

## अधिकाऱ्यासमोर मांडल्या शंका

ग्रामस्थांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ देणार नाही, याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी बोलणे झाले असून त्यांनीदेखील स्थानिक भूमिपुत्रांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही, याची खात्री दिल्याची माहिती जैन यांनी दिली. ग्रामस्थांनी त्यांच्या मनातील शंका बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. त्यांच्या शंकांचे योग्य ते निरसन करण्यात आले. काही समाजकंटक स्थानिकांमध्ये अनेक प्रकारचे गैरसमज पसरवत असून अशा गैरसमजाला बळी न पडण्याचे आवाहन त्यांनी ग्रामस्थांना केले.

यावेळी अप्पर तहसीलदार नीलेश गौंड, महापालिका उपायुक्त मारुती गायकवाड, प्रभाग अधिकारी कांचन गायकवाड, मंडळ अधिकारी दीपक अहिरे, पोलिस निरीक्षक दादासाहेब करांडे, माजी नगरसेवक चंद्रकांत वैती, रोहिदास पाटील, शरद पाटील, कलमेत गौऱ्या (पाटील), शैलेश मामूनकर, ज्यूड सामऱ्या, ऑस्टीन सामऱ्या, प्रकाश कोळी, बाबू कांबळे, स्थानिक कोळी बांधव उपस्थित होते.

CamScanner

दि. २६/०५/२०२३


लोकमत पु. पा. न. ४

# गुन्ह्यांची उत्कृष्ट उकल करणाऱ्या अधिकाऱ्यांना पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** एप्रिल महिन्यात सहा गुन्ह्यांची उत्कृष्ट उकल केल्याबद्दल मीरा भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालयातील पोलिस अधिकाऱ्यांना पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी पुरस्कार देऊन कौतुक केले.

वसईच्या बंगली येथे राहणाऱ्या ६२ वर्षीय किरण मगीया यांच्या गळ्यातील सोनसाखळी खेचून दुचाकीचालकाचा तपास गुन्हे शाखा २ चे पोलिस निरीक्षक शाहूराज रणवरे व पथकाने केला. आंबिवलीच्या इराणी वस्तीमधून जोखीम पत्करून पोलिसांनी अब्बास इराणी (वय २४) ह्या आरोपीला अटक केली. त्याने केलेले एकूण १६ गुन्हे उघडकीस आणून ३ लाख ३१ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केल्याबद्दल पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक पोलिस पथकास देण्यात आले.



गुन्ह्यांची उत्कृष्ट उकल केल्याबद्दल पोलिस अधिकाऱ्यांचे पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी पुरस्कार देऊन कौतुक केले.

## हे ठरले स्पेशल रिवॉर्डचे मानकरी

**१** माजी नगरसेवक व केबल व्यावसायिक यांच्या घरातून ७४ लाख ५० हजार रोख व १२ हजारांचे दागिने चोरणाऱ्या त्यांचाच सहकारी संजीवकुमार सिंह ऊर्फ नेताजी याला गुन्हे शाखा १ चे पोलिस निरीक्षक अविराज कुराडे व पथकाने अटक करून सर्व रोकड हस्तगत केली.

**२** त्याबद्दल स्पेशल रिवॉर्डचे पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले. एटीएममध्ये मदतीच्या बहाण्याने लोकांना लुबाडणाऱ्या साहिल शेख व सागर मंडल याना अटक करून ६ गुन्हे उघडकीस आणत दुचाकी, दीड लाख जप्त केल्याबद्दल विरार गुन्हे शाखा ३ चे पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख व पथकास स्पेशल रिवॉर्ड २ चा पुरस्कार देण्यात आला.

**३** वालिव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक कैलास बर्वे व पथकाने घरफोडींचे १० गुन्हे उघडकीस आणत महेश वेदक (रा. वालीव) व बद्रिआलम चौधरी (रा. सातिवली) यांना शिताफीने अटक केली. त्यांच्याकडून ३ लाख ४२ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला. यासाठी स्पेशल रिवॉर्डचे तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक पोलिस आयुक्तांनी दिले.

नालासोपाराच्या संकेत मोहिते याची दुचाकी कर्जाचे हप्ते थकले म्हणून बळजबरी काढून घेत ती विकल्याप्रकरणी नालासोपारा पोलिस व गुन्हे शाखा २ च्या पथकाने तपास करून पॉल नाडर, सलमान शेख व सुधांशु कनोजिया या तिघांना अटक केली. त्यांनी अशाप्रकारे गुन्हे केलेल्या २१ लाख ४० हजार किमतीच्या तब्बल ३४ दुचाकी पोलिसांनी हस्तगत केल्या आहेत. नालासोपाराचे वरिष्ठ निरीक्षक विलास सुपे आणि गुन्हे शाखा २ चे निरीक्षक शाहूराज रणवरे व पोलिस पथकास दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले.

एका बंद टेम्पोतील २१ लाख ९१ हजारांचे मोबाईल व इलेक्ट्रिक साहित्य चोरल्याप्रकरणी गुजरातमधून विशाल राजभर याला काशिमीरा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संदीप कदम व पथकाने अटक केली. त्याच्याकडून सर्व मुद्देमाल हस्तगत केल्याबद्दल तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले.

लोकमत पु. पा. न. ३

# सहा नवीन सहायक पोलिस आयुक्त रुजू

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा भाईंदर - वसई विरार पोलिस आयुक्तालयात सहा सहायक पोलिस आयुक्त नव्याने आले असून एका सहायक पोलिस आयुक्तांची मुंबईत बदली झाली आहे.

नुकत्याच झालेल्या सहायक पोलिस आयुक्तांच्या बदल्या आणि सहायक पोलिस आयुक्तपदी पोलिस निरीक्षकांना पदोन्नती देण्यात आल्या आहेत. त्यामध्ये मीरा भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालयात ६ सहायक पोलिस आयुक्त रुजू झाले आहेत. पुणे शहरमधून बजरंग हिंदुराव देसाई, नाशिक शहरमधून दीपाली मोहन खन्ना, ठाणे शहरमधून उमेश शंकर माने तर सिल्लोड उपविभाग येथून विजयकुमार मराठे ह्या सहायक पोलिस आयुक्तांची मीरा भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालयात नियुक्ती झाली आहे.



याशिवाय भास्कर पुकळे व महेश तरडे या पोलिस निरीक्षकांना पदोन्नती मिळून त्यांची नियुक्तीदेखील मीरा भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालयात सहायक पोलिस आयुक्त म्हणून झाली आहे. तरडे हे सध्या कल्याण वाहतूक पोलिस निरीक्षक म्हणून कार्यरत होते. पुकळे यांनी पोलिस आयुक्तालय व ठाणे ग्रामीण कार्यकाळात देखील भाईंदर व वसई क्षेत्रात काम केले आहे. तर तरडे यांनी देखील ठाणे ग्रामीण असताना मीरा भाईंदर शहरात सहायक पोलिस निरीक्षक म्हणून काम केले आहे. नवघर - नया नगरचे सहायक पोलिस आयुक्त डॉ. शशिकांत भोसले यांची मुंबईत बदली करण्यात आली आहे.

लोकसत्ता पु. पा. न. १

# उसगावात वृद्धाची हत्या

**वसई :** विरारजवळील उसगाव येथे एका वृद्धाची हत्या करण्यात आली आहे. भिवा भिखा वायडा असे या वृद्ध व्यक्तीचे नाव आहे. ते बुधवारी सायंकाळी कामानिमित्त काजूपाडा येथे जात असल्याचे सांगून घराबाहेर पडले होते. सकाळपर्यंत त्यांचा काहीच पत्ता नसल्याने त्यांचा मुलगा शोध घेत असताना उसगाव देसाईवाडी येथे त्यांचा मृतदेह दगडाने ठेचलेल्या अवस्थेत सापडला. रात्रीच्या सुमारास अनोळखी व्यक्तींनी त्यांची हत्या केली असावी, अशी शक्यता पोलिसांनी वर्तवली. त्यांची नेमकी हत्या कोणी केली याचा तपास सुरू आहे.

CamScanner

लोकसत्ता पा.नं.८

# संसद भवन उद्घाटनावरून वाद कायम

## काँग्रेस-भाजपची परस्परांवर टीका

**पीटीआय, नवी दिल्ली**

**नवीन संसद** भवनाच्या उद्घाटनावरून निर्माण झालेला वाद गुरुवारीही शमला नाही. केंद्रातील मोदी सरकारच्या अहंकारांमुळे देशाची संसदीय प्रणाली उद्ध्वस्त झाली आहे, अशी टीका काँग्रेसने केली. तर विरोधकांचा बहिष्काराचा निर्णय म्हणजे आपल्या महान देशाची लोकशाही मूल्ये आणि घटनात्मक मूल्यांचा उघड अपमान आहे अशी टीका भाजपप्रणित रालोआने केली आहे. दरम्यान, तेलुगू देसम पक्ष उद्घाटनाला हजर राहणार आहे.

उद्घाटन सोहळ्याच्या मुद्द्यावरून काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान मोदींवर टीका केली. ते म्हणाले की, एका व्यक्तीचा अहंकार आणि स्वतःचा उदोउदो करण्याची इच्छा यामुळे देशातील पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपतींचा घटनात्मक विशेषाधिकार हिरावून घेतला जात आहे. तर संसद भवनाचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते का केले जात नाही असा प्रश्न दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी विचारला. दुसरीकडे रालोआचा पूर्वीचा घटक पक्ष असलेल्या तेलुगू देसम पक्षाने या उद्घाटन सोहळ्याला उपस्थित राहण्याचा निर्णय घेतला असून, पक्षाचे अध्यक्ष एन चंद्राबाबू नायडू यांनी राज्यसभेचे खासदार के रवींद्र कुमार यांना पक्षाचे प्रतिनिधित्व करण्यास सांगितले.

### वाद सर्वोच्च न्यायालयात

नवीन संसद भवनाचे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी करावे यासाठी लोकसभा सचिवालय आणि केंद्र सरकारला निर्देश द्यावेत अशी मागणी करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. लोकसभा सचिवालय आणि केंद्र सरकार राष्ट्रपतींना उद्घाटन सोहळ्याचे आमंत्रण न देऊन त्यांचा अपमान करत आहेत असा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

**संसद हे लोकांनी स्थापन केलेले लोकशाहीचे मंदिर आहे. राष्ट्रपती कार्यालय हा संसदेचा भाग आहे. तुमच्या अहंकारांमुळे देशाची संसदीय प्रणाली उद्ध्वस्त झाली आहे. संसद भवनाचे उद्घाटन करण्याचा राष्ट्रपतींचा अधिकार तुम्हाला का हिरावून घ्यायचा आहे हे १४० कोटी भारतीयांना जाणून घ्यायचे आहे.**

**- मल्लिकार्जुन खरगे,** काँग्रेसाध्यक्ष

**पंतप्रधान मोदी यांनी आतापर्यंतच्या पंतप्रधानांचा आदर केला आहे, आता विरोधकांनीही मोठे मन करून उद्घाटन सोहळ्याला उपस्थित राहावे. - रवीशंकर प्रसाद,** भाजप नेते

लोकसत्ता पा. न. ४

# विरोधकांचा लोकशाहीवर विश्वास नाही!

## संसदेच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकणाऱ्यांवर फडणवीसांची टीका

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**मुंबई :** काँग्रेस आणि जे अन्य पक्ष संसदेच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकण्याची भाषा करीत आहेत, त्यांचा लोकशाहीवर अजिबात विश्वास नाही. संसद ही केवळ एक इमारत नाही, तर १४० कोटी देशवासीयांच्या आस्थेचे मंदिर आहे, असे सांगतानाच यापूर्वीची अशी अनेक उदाहरणे देत त्या वेळी बहिष्कार का आठवला नाही, असा सवाल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विरोधकांना केला.

### 'पोटशूळ का?'

विरोधकांनी जे केले ते लोकशाहीवादी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाच्या नव्या संसदेचे उद्घाटन करणार असतील तर मग पोटशूळ का, विरोधक हे खुर्चीचे व्यापारी आहेत. सत्ता आणि खुर्चीच्या लोभाने ते एकत्र येतात. विरोधकांकडे नेता, नीती आणि नियत तिन्ही नाहीत, अशी टीका फडणवीस यांनी केली.

नवीन संसद इमारत ही नव्या भारताच्या शक्तीचे प्रतीक आहे. अवघ्या ३ ते ४ वर्षांत ही वास्तू तयार झाली आहे. माजी पंतप्रधान पंडित नेहरूंनी कर्नाटक विधानसभेचे भूमिपूजन केले होते. माजी पंतप्रधान इंदिरा गांधींनी संसदेच्या विस्तारित (अॅनेक्स) इमारतीचे आणि महाराष्ट्र विधान भवनाचे उद्घाटन केले. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी संसदेच्या वाचनालयाचे उद्घाटन केले. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी बिहार विधानसभेतील मध्यवर्ती सभागृहाचे उद्घाटन केले. मणिपूरमधील नवीन विधानसभेचे उद्घाटन तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी केले. आसाम विधानसभेचे भूमिपूजन तरुण गोगोई यांनी केले, पण राज्यपालांना साधे निमंत्रणही देण्यात आले नाही. २०१८ मध्ये आंध्र विधानसभेचे भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. २०२० मध्ये कुठल्याही संवैधानिक पदावर नसताना सोनिया गांधी यांनी छत्तीसगड विधानसभेचे भूमिपूजन केले, त्यात तर राहुल गांधी हेही प्रमुख पाहुणे होते. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनी विधानसभेच्या अमृतमहोत्सवी इमारतीचे उद्घाटन केले. या सर्व प्रसंगांत विरोधकांना बहिष्कार का आठवला नाही, असा सवाल फडणवीस यांनी उपस्थित केला.

CamScanner

लोकसत्ता पु.पा.न. १ दि. २६/०५/२०२३

### लाचखोरीच्या घटनांमुळे चिंता

**वसई :** पोलीस आयुक्तालयातील विविध पोलीस ठाण्यातील पोलिसांच्या लाच घेण्याच्या प्रकरणांत वाढ झाली आहे. याबाबत आयुक्त मधुकर पांडे यांनी अधिकाऱ्यांची कानउघडणी केली आहे.

वृत्त...४

# पोलीस दलातील लाचखोरीच्या वाढत्या घटनांमुळे चिंता

## पोलीस आयुक्तांकडून अधिकाऱ्यांना समज

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**

**वसई :** मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील विविध पोलीस ठाण्यातील पोलिसांच्या लाच घेण्याच्या प्रकरणांत वाढ झाली आहे. याबाबत आयुक्त मधुकर पांडे यांनी मासिक बैठकीत अधिकाऱ्यांची कानउघडणी केली आहे.

गेल्या काही दिवसांपासून पोलीस कर्मचाऱ्यांच्या लाचखोरीचे प्रकरणे वाढली आहेत. लाचखोरीचे लोण अगदी पोलीस आयुक्तालय कार्यालयापर्यंत पोहोचले आहे. पोलीस आयुक्तालयातील दोन कर्मचाऱ्यांनाही लाच घेताना पकडण्यात आले होते. या वाढत्या लाचखोरीच्या प्रकरणांमुळे चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

बुधवारी पोलीस आयुक्तालयात झालेल्या साप्ताहित बैठकीत या वाढत्या लाचखोरीच्या प्रकरणांबाबत आयुक्त मधुकर पांडे यांनी अधिकाऱ्यांची कानउघडणी केली आहे. आपल्या कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवणे, त्यांना कामाच्या बाबतीत समज देणे तसेच असे प्रकार होऊ नयेत, याची खबरदारी घेण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत. नागरिक तक्रार करत नाहीत. अन्यथा प्रत्येक पोलीस ठाण्यात दररोज दोन लाचखोरीचे सापळे लागले असते, अशी उद्विग्न प्रतिक्रिया एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

### पोलिसांच्या लाचखोरीचे प्रकरण

- १६ मे : तुळींज पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक रामचंद्र शेंडगे यांच्यावर एक लाखाची लाच मागितल्याप्रकरणी गुन्हा दाखल.
- १९ मे- अदखलपात्र गुन्ह्यात तडजोड करण्यासाठी एक हजाराची लाच घेताना विरार पोलीस ठाण्यातील महिला पोलीस हवालदार समीक्षा मोहिते यांना रंगेहाथ अटक.
- ९ मे- पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठ लिपिक संजय पवार (४६) आणि लिपिक गणेश वाघेरे (३२) यांनी तक्रारदाराकडे दीड हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी गुन्हा. एका लिपिकाला अटक.
- २९ मार्च- नवघर पोलीस ठाण्याती पोलीस हवालदार अमित पाटील याला गुटख्या विक्रेत्यावर कारवाई न करण्यासाठी १० हजारांची लाच घेताना अटक.
- १३ जानेवारी- पोलीस ठाण्यातील दाखल असलेल्या गुन्ह्यात अटक टाळण्यासाठी २० हजारांची लाच घेताना आचोळे पोलीस ठाण्यातील योगेश देवरे आणि जितेंद्र बनसोडे दोन पोलिसांना ठाण्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली.

लोकसत्ता पु.पा.न. ४

# रिक्षात विसरलेले दागिने परत

**भाईंदर :** रिक्षात राहिलेली २१ तोळे दागिन्यांची पिशवी एका कुटुंबास अवघ्या पाच तासांत पोलिसांनी परत केली आहे. यामुळे या कुटुंबाने पोलिसांचे आभार मानले आहेत.

काशिमीरा येथे राहणारे एक कुटुंबीय कामानिमित्त रिक्षाने बोरिवलीच्या दिशेने प्रवास करत होते. या वेळी त्यांच्या जवळ असलेली दागिन्याची पिशवी सुरक्षित राहावी म्हणून त्यांनी ती रिक्षाच्या मागील बाजूस ठेवली होती. परंतु रिक्षातून उतरताना ते ती पिशवी घेण्यास विसरले. काही वेळानंतर आपली पिशवी हरवल्याचे लक्षात येताच त्यांनी तत्काळ काशिमीरा पोलीस ठाण्यात धाव घेतली. या बाबत तक्रार मिळताच पोलीस निरीक्षक संदीप कदम यांनी तपास करण्याच्या सूचना दिल्या. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या मदतीने रिक्षाचा शोध घेण्यात आला. रिक्षात दागिन्यांची पिशवी सुरक्षित होती. ही पिशवी मागे असल्याची कल्पना चालकाला नव्हती. दागिन्यांची पिशवी तक्रारदाराला परत करण्यात आली आहे.

लोकसत्ता पु.पा.न. १

# कर घोटाळ्याप्रकरणी सखोल चौकशी सुरू

## लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे तक्रार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार महापालिकेतील कराच्या पैशांच्या अपहार प्रकरणात आयुक्तांनी नेमलेल्या समितीने सखोल चौकशी सुरू केली आहे. प्रभाग समिती 'सी'मध्ये हा कर घोटाळा उघडकीस आला होता. त्यामुळे मागील आर्थिक वर्षात रोखीने भरलेल्या ६७ हजार कर पावत्या तपासण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. दरम्यान, या प्रकरणी संबंधितांच्या मालमत्तांची चौकशी करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडेही तक्रार करण्यात आली आहे.

महापालिकेच्या 'सी' (चंदनसार) प्रभागात कर घोटाळा उघडकीस आला आहे. नागरिकांनी रोख भरलेली ४६ लाख रुपयांची रक्कम कर अधीक्षक अरुण जानी यांनी बँकेत न भरता स्वतः वापरली होती. पालिकेकडे आलेल्या तक्रारीनुसार १८ एप्रिल ते १६ मे २०२३ या कालावधीत 'सी' प्रभागात ७२ लाख ६८ हजार ८९९ रुपये जमा झाले होते. त्यापैकी जानी याने ४६ लाख भरले नव्हते.

### ६७ हजार कर पावत्या तपासणार

२०२१-२२ या आर्थिक वर्षात पालिकेने ३२१ कोटींची कर वसुली केली होती. त्यानंतर २०२२-२३ या आर्थिक वर्षात महापालिकेने ३७१ कोटी एवढी विक्रमी करवसुली केली. त्यातील १४६ कोटी म्हणजे ३९.३३ टक्के रक्कम ही रोखीने जमा झाली होती. तर २२५ कोटी ३ लाख रुपये म्हणजे ६०.६७ टक्के रक्कम ही ऑनलाइन जमा झाली होती. त्यामुळे रोखीने कर भरणाऱ्या ३ लाख ३९ हजार ४७२ करदात्यांनी रोखीने भरलेल्या रकमेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे या घोटाळ्याच्या तपास करण्यासाठी पालिकेने 'सी' प्रभागात मागील आर्थिक वर्षात जमा झालेल्या ६६ हजार ९१२ कर पावत्यांची चौकशी करण्यास सुरुवात केली आहे.

### घोटाळा नव्हे, अनियमितता

मालमत्ता करातून अधिकाअधिक उत्पन्न पालिकेला मिळावे यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. यंदा विक्रमी करवसुली करण्यात आली होती. काही कर्मचाऱ्यांनी रोखीने भरलेल्या पैशांचा गैरवापर केला होता. मात्र हा घोटाळा नसून अनियमितता होती, असे पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सांगितले. अपहार झालेले सर्वच्या सर्व पैशांचा भरणा झालेला आहे. तो वेळत झाला नव्हता. काही दिवस संबंधिक कर अधीक्षकाने स्वतःच्या फायद्यासाठी वापर केला होता, असे ते म्हणाले.

CamScanner

लोकसत्ता पु.पा.न. ९

दि. २६/०५/२०२३

## टेम्पो व्यावसायिक आर्थिक संकटात

**भाईंदर :** शहरातून स्थलांतरित होणाऱ्या औद्योगिक वसाहती, ऑनलाइन किंवा अॅप आधारित टेम्पो सेवांची स्पर्धा तसेच टेम्पो उभा करण्यासाठी जागेची कमतरता, अशा विविध कारणांमुळे मीरा-भाईंदरमधील टेम्पो व्यावसायिक संकटात सापडले आहेत. वृत्त...४

# टेम्पो व्यावसायिक आर्थिक संकटात

## औद्योगिक वसाहतींच्या स्थलांतरामुळे वाहतूक भाडे मिळेना

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** शहरातून स्थलांतरित होणाऱ्या औद्योगिक वसाहती, ऑनलाइन किंवा अॅप आधारित टेम्पो सेवांची स्पर्धा तसेच टेम्पो उभा करण्यासाठी जागेची कमतरता, अशा विविध कारणांमुळे मीरा-भाईंदरमधील टेम्पो व्यावसायिक आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे नाईलाजाने हा व्यवसाय सोडून इतर काम करण्याची नामुष्की त्यांच्यावर ओढवली आहे.

मीरा-भाईंदर हे शहर पूर्वीपासून 'औद्योगिक वसाहतीं'चे शहर म्हणून ओळखले जात होते. या शहरात एकेकाळी स्टील, बांगडी, चष्मा आणि कॅरम निर्मिती करणारे उद्योग मोठ्या प्रमाणात होते. येथून संपूर्ण देशात या वस्तू पुरवल्या जात होत्या. त्यामुळे या वस्तूंची अथवा इतर साधनसामग्रींची ने-आण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात टेम्पोंची आवश्यकता भासत होती. याचाच फायदा घेत साधारण १९८० पासून या शहरात अनेकांनी टेम्पो व्यवसाय सुरू केला. त्यामुळे या शहराला 'टेम्पो व्यावसायिकांचे शहर' अशीही ओळख मिळाली. हे व्यावसायिक पूर्वीपासून भाईंदर फाटक भागात टेम्पो उभे करत असल्याने त्यास 'टेम्पो नाका', असे म्हटले जाऊ लागले. कालांतराने याच नाक्यावर या व्यावसायिकांना वाहतुकीची खासगी भाडीही मिळू लागली. यामुळे हमाल व इतर कामगारांनाही कामे मिळाल्याने रोजगार निर्मिती झाली.

परंतु, मागील काही वर्षांत मीरा-भाईंदरचा झपाट्याने झालेला विकास हा येथील औद्योगिक वसाहतींसाठी आणि टेम्पो व्यवसायासाठी अडचणीचा ठरू लागला. यामुळे अनेक औद्योगिक वसाहती या वसई व पालघरच्या दिशेने स्थलांतरित होऊ लागल्या आहेत. परिणामी याचा फटका टेम्पो व्यवसायाला बसला आहे.



"सध्या वाहतूक भाडे मिळत नसल्यामुळे टेम्पो चालकांना आपल्या वाहन कर्जाचे हप्ते भरणे कठीण होत आहे. उदरनिर्वाह करण्याची चिंता मोठी आहे. त्यामुळे टेम्पो चालकांना काम कसे मिळेल, यासाठी आम्ही पर्याय शोधत आहोत. - संदीप राणे, अध्यक्ष, मीरा-भाईंदर टेम्पो युनियन

याशिवाय सध्या टेम्पो नाक्याजवळ मेट्रो मार्गिकेचे काम सुरू असल्याने टेम्पो चालकांना आपली वाहने इतर ठिकाणी उभी करावीत, अशा सूचना प्रशासनाकडून दिल्या जात आहेत. नाक्यावर टेम्पो उभे करणे कठीण झाल्याने मिळणाऱ्या खासगी वाहतूक भाड्यावर त्याचा परिणाम होऊ लागला आहे. त्यात नव्याने विकसित झालेल्या अॅप आधारित टेम्पो सेवा, ऑनलाइन कार्यप्रणालीची माहिती काही असुशिक्षित टेम्पो चालकांना नसल्यामुळे काम कसे मिळवावे, असा गंभीर प्रश्न त्यांच्या पुढे आहे. त्यामुळे प्रशासनाने योग्य ठिकाणी टेम्पो उभा करण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून आमचा रोजगार टिकेल, अशी मागणी टेम्पो चालकांच्या संघटनेकडून केली जात आहे.

CamScanner

दि. २६/०५/२०२३

पुढारी पा.नं. २

# ठाकरे गटाच्या आमदारांनी घेतली राहुल नार्वेकरांची भेट

## १६ आमदारांच्या अपात्रतेवर तातडीने निर्णय घेण्याची केली मागणी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्यांनी गुरुवारी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेत १६ आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर लवकरात लवकर निर्णय घेण्याची मागणी केली.

राज्यातील सत्तासंघर्षावरील निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने आमदारांच्या अपात्रतेवर निर्णय घेण्याचा मुद्दा विधानसभा अध्यक्षांकडे सोपविला. योग्य कालावधीत (रिझनेबल टाईम) मध्ये यावर निकाल देण्याच्या सूचना देतानाच सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात काही मर्यादाही घालून दिल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आल्यानंतर याप्रकरणी तातडीने निर्णय घेण्याची मागणी ठाकरे गटाने लावून धरली आहे. याच पार्श्वभूमीवर गुरुवारी ठाकरे गटाच्या आमदारांच्या शिष्टमंडळाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेतली. १६ आमदारांच्या अपात्रतेचा लवकरात लवकर निर्णय घ्यावा, या मागणीचे निवेदन शिष्टमंडळाने नार्वेकर यांना दिले.

अध्यक्षांसोबत झालेल्या भेटीत सकारात्मक चर्चा झाल्याचे विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने १६ आमदारांच्या अपात्रतेच्या बाबतीत जे प्रकरण सोपवले आहे, त्याबाबत लवकरात लवकर सुनावणी होईल, अशी आम्हाला खात्री असल्याचेही ते म्हणाले.

### विधानसभा अध्यक्षांनी घेतली अमित शहांची भेट

● विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता आणि केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांची गुरुवारी भेट घेतली. १६ आमदारांच्या अपात्रतेसंबंधीचा निर्णय घटनापीठाने विधानसभा अध्यक्षांकडे सोपवला आहे. या निकालानंतर पहिल्यांदाच ही भेट झाल्याने राजकीय तर्क-वितर्क लढवले जात आहेत.

पुढारी पा. न. ३

# जबरी चोरी करणाऱ्या दोघांना अटक

**मिरारोड :** पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत जबरी चोरी करणाऱ्या दोघांना पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक करुन ४ गुन्हे उघडकीस आणले आहेत. पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दत्तात्रय जगन्नाथ बेलोसे (४३) हे त्यांच्या मोटर सायकलवरुन गुजरातच्या दिशेने जात असताना सायली पेट्रोल पंपाजवळ, वसई फाटा येथे दोन अनोळखी इसमांनी मोटर सायकलवर येवून बेलोसे यांच्या खिशात असलेला मोबाईल फोन जबरीने हिसकावून घेवून पळून गेले. त्याबाबत पेल्हार पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात आरोपी व गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या मोटार सायकलचा गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तपास करून मोहम्मद सलीम अन्सारी (२१) व मोहम्मद वारीस अली खान (२०) दोन्ही रा. अंजुर फाटा, भिवंडी यांना या गुन्ह्यात २४ तासाचे आत अटक केली. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली मोटार सायकल व मोबईल हस्तगत करण्यात आला आहे.

पुढारी पा. न. ५

# मिरा रोडमध्ये हुक्का पार्लरवर कारवाई

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरारोड पोलीस ठाणे हद्दीत बेव्हलपार्क येथे डिव्हाईन हुक्का पार्लरमध्ये अवैधरित्या तंबाखू मिश्रीत हुक्का ग्राहकांना ओढण्यासाठी उपलब्ध करुन देत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. सपोनिरी सोनवलकर यांनी पथकासह डिवाईन हुक्का पार्लर येथे छापा टाकला असता हुक्का पार्लरमध्ये काही ग्राहक हुक्का पित असल्याचे दिसून आले. त्यावेळी चालक दिपक शिवराजराव मालचापुर (२०) व रमजान हबीब शेख (१९) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. हुक्का पार्लरमध्ये पार्लरचे मॅनेजर दिपक शिवराजराव मालचापुर याने आर्थिक फायद्यासाठी सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या ग्राहकांना तंबाखुयुक्त हुक्का ओढण्यासाठी उपलब्ध करून दिला तसेच ग्राहकांच्या समोर टेबलावर हुक्क्याचे पात्र होते. तंबाखुजन्य हुक्का पित असताना मुद्देमालासह मिळुन आले म्हणुन हॉटेल अस्थापना चालक, वेटर / स्टुअर्ड व ग्राहक यांच्याविरुध्द मिरारोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

CamScanner

दि. २६/०५/२०२३

पुण्य नगरी पु. पा. न. २

# वसई-विरारकरांच्या प्रश्नांसाठी काँग्रेसचा पालिकेवर १ जूनला धडक मोर्चा

**नालासोपारा :** वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना २००९ मध्ये झाली. नागरिकांना चांगल्या सोयीसुविधा मिळाव्यात म्हणून स्थापन झालेल्या महानगरपालिकेला लवकरच १४ वर्षे पूर्ण होत आहेत. तरीही पिण्याचे पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण या महत्त्वाच्या विषयांवर महानगरपालिका म्हणावे असे कार्य करत नाही. त्यामुळे नागरिक उदास आहेत. काँग्रेसने याविरोधात आवाज उचलला असून, १ जून रोजी याविरोधात पालिकेवर मोर्चा काढणार आहे.

मागील अनेक वर्षांपासून नागरिकांच्या समस्या घेऊन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या पर्यावरण विभागाचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जिल्हा परिषद सदस्य समीर सुभाष वर्तक सातत्याने त्यांच्या सहकाऱ्यांसोबत महानगरपालिकेत येत आहेत; परंतु समस्यांचे निराकरण करणे राहिले दूरच आयुक्त आणि महानगरपालिकेतील इतर अधिकाऱ्यांची भेटही सर्वसामान्यांना मिळणे दुर्लभ होत आहे आणि सर्व प्रश्न जिथल्या तिथे आहेत. मात्र, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराची नवनवीन प्रकरणे दिवसेंदिवस बाहेर येत आहेत.

म्हणूनच नागरिकांचे महत्त्वाचे प्रश्न घेऊन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या पर्यावरण विभागातर्फे गुरुवारी १ जून रोजी सकाळी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मुख्यालयावर प्रलंबित विषयांसाठी धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. २००८ पासून सुरू झालेली ६९ गावांची पिण्याच्या पाण्याची योजना पूर्ण का होत नाही? आम्हाला महानगरपालिका पाणी का देत नाही?, दिवाणमान येथील सर्वधर्मिय दफनभूमी तत्काळ सुरू करावी. महानगरपालिका क्षेत्रातील सर्वधर्मिय लोकसंख्येनुसार स्मशानभूमी, दफनभूमीचे निर्माण करावे. महानगरपालिकेची परिवहन सेवा २४ तास असावी अन्यथा एसटी महामंडळाची बससेवा चालू करा, अशा अनेक मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे.

पुण्य नगरी पु. पा. न. १

# दिवाणी न्यायालयाच्या जागेचा कर माफ करा!

## न्यायाधीशांची महापालिकेकडे मागणी



**मीरा रोड :** मीरा-भाईंदर शहरातील नागरिकांना न्यायालयीन कामकाजासाठी ठाणे येथे जावे लागत होते. त्यामुळे शहरातील नागरिकांनी मीरा-भाईंदरमध्ये न्यायालय सुरू करण्याची मागणी केली होती. त्यानुसार मीरा-भाईंदर येथे न्यायालयीन इमारत व न्यायिक अधिकाऱ्यांचे निवासस्थान बांधकाम घोडबंदर येथे २०१४ पासून सुरू करण्यात आले आहे. न्यायालयाच्या बांधकामासाठी महापालिकेने सर्व बांधकामांच्या परवानग्या दिल्या आहेत. निधीअभावी न्यायालयाचे काम काही वर्षे बंद होते. त्यानंतर निधी उपलब्ध झाल्यानंतर पुन्हा काम सुरू करण्यात आले आहे. त्यानंतर या मोकळ्या जागेच्या कराची रक्कम भरण्यासाठी कळवण्यात यावे, असे न्यायालयाने सार्वजनिक बांधकाम विभागाला कळवले. त्यानुसार मीरा-भाईंदर महापालिकेने ९१ लाख ३ हजार १९२ रुपये रक्कम पालिकेत जमा करण्यासाठीचे पत्र ८ मे रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग यांना पाठवले. मात्र, ही कराची रक्कम जास्त असल्याचे सांगत मीरा-भाईंदर महापालिकेला पत्र पाठवून जिल्हा न्यायालयाच्या प्रमुख न्यायाधीशांनी मोकळ्या जागेचा संपूर्ण कर माफ करण्याची विनंती केली आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेने शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी मौजे घोडबंदर येथील न्यायालयासाठी आरक्षित असलेल्या जागा सार्वजनिक बांधकाम विभागाला उपलब्ध करून दिलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने जागा उपलब्ध झाल्यानंतर राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर करून राज्याच्या विधी व न्याय विभागाकडून १९ मार्च २०१३ रोजी न्यायालयाची तीन मजली इमारत बांधण्याची मान्यता घेतली. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने न्यायालयाच्या बांधकामासाठी ठेकेदाराची नियुक्ती केली. त्यानुसार २०१४ साली न्यायालयाचे बांधकाम सुरू झाले. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यातील निधीअभावी २०१७ मध्ये बांधकाम बंद करण्यात आले. त्यानंतर सुधारित अंदाजपत्रक सादर करून मान्यता घेतली. परंतु राज्य शासनाकडून निधी मिळण्यास उशीर झाल्याने बांधकामाला उशीर झाला होता. मुख्य न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्यातील अंतर्गत सजावट व न्यायाधीशांच्या निवासासाठी असलेल्या इमारतीच्या बांधकामासाठी निधीला मान्यता मिळावी, यासाठी उच्च न्यायालयाने राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे २८ ऑगस्ट २०२० रोजी प्रस्ताव पाठवला. शासनाकडून निधी मंजूर झाल्यानंतर जून २०२२ पासून न्यायालयीन इमारतीचे व न्यायिक अधिकाऱ्यांच्या निवासस्थानाचे उर्वरित बांधकाम सुरू करण्यात आले. हे बांधकाम प्रगतीपथावर आहे. मीरा-भाईंदर येथे बांधण्यात येणाऱ्या न्यायालयीन इमारत व न्यायिक अधिकाऱ्यांसाठी निवासस्थानाची इमारत या भोवतालच्या मोकळ्या जागेच्या कराची अंदाजित रक्कम या कार्यालयाला कळवण्यात यावे, असे कळवले होते. त्यानुसार महापालिकेने २०१७ पासून मोकळ्या जागेच्या करापोटी सार्वजनिक बांधकाम विभागाला ८ मे २०२३ रोजी पत्र पाठवून ९१ लाख ३ हजार १९२ रुपये पालिकेत जमा करण्याबाबत कळवले. त्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाने जिल्हा व सत्र न्यायालयाला दिल्यानंतर या न्यायालयाच्या प्रमुख न्यायाधीशांनी ही इमारत न्यायालयीन इमारत आहे व फक्त न्यायालयीन कामासाठी वापरात येणार आहे. ही इमारत लोकहितार्थ व मीरा-भाईंदर येथील नागरिक, महापालिका यांच्या न्यायालयीन सोयीसाठी बांधण्यात येत आहे. त्यामुळे महापालिकेने मोकळ्या जागेचा संपूर्ण कर माफ करावा, अशी मागणी करणारे पत्र मनपा आयुक्त दिलीप ढोले यांना पाठवले आहे.

CamScanner

दि. २६/०५/2023

सकाळ पु. पा. नं. १

## औषधे बदलण्याच्या बहाण्याने फसवणूक

भाईंदर, ता. २५ (बातमीदार) : ऑनलाईन पद्धतीने मागवलेली औषधे बदलण्यासाठी मदत करण्याच्या बहाण्याने मिरा रोड येथे राहणाऱ्या एका महिलेची सुमारे साडेतीन लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणी मिरा रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, तिने ऑनलाईन औषधे मागवली होती. ही औषधे आल्यानंतर तिने डॉक्टरांना दाखवली; परंतु त्यांनी औषधे बदलायला सांगून नवी औषधे लिहून दिली. औषधे बदलण्यासाठी महिलेने इंटरनेटवर हेल्पलाईनचा नंबर शोधला. समोरच्या व्यक्तीने महिलेला औषधे बदलण्यासाठी मदत करण्याचे आश्वासन दिले व मोबाईल ॲप्लिकेशन डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यानंतर सायबर चोरट्यांनी महिलेचे क्रेडिट कार्ड व अन्य तपशील माहिती करून घेतला. काही वेळातच महिलेच्या बँक खात्यातून तीन लाख ४७ हजार रुपये काढून घेण्यात आले.

सकाळ पु. पा. नं. १

# हक्कांसाठी कामगारांचा मोर्चा

## वसई-विरार पालिकेत 'समान वेतन, समान काम'ची मागणी



नालासोपारा : 'समान वेतन, समान काम' या मुख्य मागणीसह भाजप कामगार आघाडीच्या मोर्चात शेकडो कर्मचारी सहभागी झाले होते.


नालासोपारा, ता. २५ (बातमीदार) : वसई-विरार महापालिकेतील कंत्राटी कामगारांच्या विविध मागण्यांसाठी भाजप कामगार आघाडीने आज (ता. २५) पालिका कार्यालयावर मोर्चा काढला. 'समान वेतन, समान काम' ही प्रमुख मागणी घेऊन विरार पूर्वेतील आर. जे. नाका ते पालिका कार्यालयापर्यंत भाजप कामगार आघाडीचे राज्य उपाध्यक्ष विजय मांडवकर यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात सफाई, औषध, पाणीपुरवठा विभागातील शेकडो कंत्राटी कामगार सहभागी झाले होते.

आज दुपारी साडेतीन वाजता हा मोर्चा विरार पूर्वेतील आर. जे. नाका येथून निघाला होता. सकाळी सर्व कामगार कामावर जाऊन, दिवसभराचे सर्व काम आटोपून कामगारांनी मोर्चात सहभाग नोंदवला होता. वसई-विरार महापालिकेत सर्वच कामगार हे कंत्राटी पद्धतीने काम करत आहेत. फार कमी कामगार हे कायमस्वरूपी आहेत. महापालिका ही ठेकेदारांची घरे भरते, मात्र कामगारांना राबवून घेत आहे. त्यामुळे हा मोर्चा काढल्याचे सांगण्यात आले. वसई-विरार महापालिकेने कामगारांना कायमस्वरूपी करावे, कामगारांना शासकीय जागेवर घरे मिळाली पाहिजेत, १५ वर्षांपेक्षा जास्त कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांना पालिकेत कायमस्वरूपी सामावून घेतले पाहिजे, पगाराच्या पावत्या मिळाल्या पाहिजेत, पीएफ सुविधा पाहिजे, या प्रमुख मागण्या घेऊन हा मोर्चा काढण्यात आल्याचे सांगण्यात आले.

सकाळ पा. नं. ५

# मी पाटील आहे, पाटीलच राहणार!

## विरोधकांना गौतमीचे प्रत्युत्तर; विरारमधील कार्यक्रमात नृत्याचा जल्लोष



नालासोपारा : विरारमधील खार्डी येथील कार्यक्रमात नृत्य सादर करताना गौतमी पाटील.

नालासोपारा, ता. २५ (बातमीदार) : प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटीलचे नृत्य पाहण्यासाठी गुरुवारी (ता. २५) रात्री विरारमध्ये तिच्या चाहत्यांनी तुफान गर्दी केली होती. गौतमीसोबत महिलांनी डान्स करत, फुगडी खेळण्याचाही आनंद घेतला; तर गौतमीला पाटील या नावावरून विरोध होत असताना अशा विरोधाला मी जास्त महत्त्व देणे सोडून दिले आहे. मी पाटील आहे तर पाटील आडनाव लावणारच, असे थेट प्रत्युत्तर तिने विरोध करणाऱ्यांना दिले आहे.

विरारच्या खार्डी गावातील प्रभाकर पाटील यांनी घराच्या सत्यनारायणाच्या कार्यक्रमात गुरुवारी गौतमी पाटीलच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. गौतमी पाटील विरारमध्ये प्रथमच आली असल्याने पालघर जिल्ह्यातील तिच्या हजारो चाहत्यांनी तिला पाहण्यासाठी आणि नृत्याचा आनंद घेण्यासाठी गर्दी केली होती. गौतमीचा कार्यक्रम म्हटले की गर्दी, धिंगाणा आलाच; पण विरारमधील कार्यक्रमात मात्र तिच्या प्रत्येक गाण्याला दाद देत, तिच्या गाण्याचा आनंद घेतला आहे.

### बोलण्याकडे लक्ष देत नाही

गौतमी पाटील ही सध्या महाराष्ट्रभर गाजत आहे. तिच्या नृत्यावरून तिला विरोध होत आहे, पण मी आता कोणत्याच विरोधाला महत्त्व देत नाही, कोणी मला काहीही बोलले तरी मी त्याकडे महत्त्व देत नाही. आता मला पाटील नावावरूनही विरोध केला जात आहे, ते नावच लावायचे नाही असे सांगतात. पण मी पाटील आहे तर पाटील आडनाव लावणारच, असे विरारमधील कार्यक्रमात गौतमी पाटीलने सांगितले आहे.

CamScanner

दि. २६/०५/२०२३

सकाळ पु.पा.नं. ३

# अर्नाळा किल्ल्यावर शिवरायांचा पुतळा

विरार, ता. २५ (बातमीदार) : अर्नाळा किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येणार आहे. त्यामुळे किल्ल्यावर येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

अर्नाळा किल्ला ग्रामपंचायतीच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पूर्णाकृती पुतळ्याचे काम हाती घेण्यात आले आहे. हे काम अंतिम टप्प्यात असल्याचे सांगण्यात आले. मनोहर वैती यांच्या शिल्पकलेतून साकारत असलेल्या या पुतळ्याची शिवसेना जिल्हाप्रमुख पंकज देशमुख यांनी पाहणी केली.



**विरार :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्नाळा किल्ल्यावरील अश्वारूढ पूर्णाकृती पुतळ्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

सामना पा.नं. ८

# पोलीस भरतीची फेरपरीक्षा घ्या

*काँग्रेसची मागणी*

मुंबई, दि. २५ (प्रतिनिधी) – मुंबईतील पोलीस भरतीमध्ये गैरप्रकार घडल्याचे उघड झाले असल्याने भरती प्रक्रिया रद्द करून फेरपरीक्षा घ्या अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह पोलीस महासंचालकांकडे केली आहे.

हायटेक कॉपी, कमी गुण मिळालेल्या उमेदवारांना पात्र ठरवणे, भरतीसाठी लाखो रुपये घेणे, पात्र विद्यार्थ्यांना वंचित ठेवून भ्रष्ट मार्गांचा अवलंब केलेल्यांना पोलीस दलात भरती करणे अशा अनेक तक्रारी यासंदर्भात आल्या असल्याचे नाना पटोले यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना यासंदर्भात पटोले यांनी पत्र पाठवले आहे. या भरती प्रक्रियेची स्वतंत्र यंत्रणेमार्फत सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी अशी मागणीही त्यांनी पत्रात केली आहे.

CamScanner